# नगर परिषद गडचांदूर

ता.कोरपना, जि.चंद्रपूर-४४२९०८

ई-मेल आईडी:-cogadchandur@gmail.com

कार्यालय संपर्क:-०७१७३-४६८४०१


दिनांक :- ४/ ०७ /२०२५

जावक क्र.अग्नि वि./१७४/२०२५

## अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र

**प्रति,**

आदित्य बिरला पब्लिक स्कूल
रा. आवारपूर
ता. कोरपना, जिल्हा – चंद्रपूर

**विषय :-** अग्निशमन विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबत.

**संदर्भ :-** १) आपला अर्ज आवक क्रमांक२१८२ दिनांक ३०/०४/२०२५ अन्वये
२) सन इंडस्ट्रीयल सर्व्हीसेस, मुबई यांचा फायर ऑडीट रिपोर्ट जाने २०२५
३) न.प. अग्निश्मान मौका चौकशी दिनांक १०/०६/२०२५

प्रमाणपत्र देण्यात येते की, अग्निसुरक्षा कायद्याचे परीक्षण करण्याकरिता संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा, मुंबई यांनी निश्चित केलेल्या एजन्सी यांनी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत आदित्य बिरला पब्लिक स्कूल मौजा आवारपूर तह. कोरपना, जि. चंद्रपूर या पब्लिक स्कूल ठिकाणातील अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण (फायर सेप्टी ऑडिट) व आग प्रतिबंधक उपाययोजना व तपासणी सन इंडस्ट्रीयल सर्व्हीसेस, मुबई (एजन्सी लायसन्स क्र. MFS/LA/RF-02/RD-03 यांनी जाने २०२५रोजी केले आहे. व सोबत फायर ऑडीट अहवाल फार्म व अग्निप्रतिबंधक उपाययोजना अस्तित्वात असल्याचे प्रमाणीत केले आहे. तरी सदर ठिकाणी नोजल, फायर हायड्रन्ट, फायर बकेट, पावडर फायर सिलेंडर ( ABC Type, $CO_2$, DCP व Water $CO_2$) तसेच इतर आवश्यक अग्निशमन सुरक्षा साहित्य उपलब्ध आहे. व पाण्याची मुबलक सोय आहे.

सदर प्रमाणपत्र दिनांक १ जुलै २०२५ – ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वैध असेल.अग्निशमन प्रतिबंधक उपाययोजनेची तपासणी दर सहा महिन्यात निश्चित केलेल्या एजन्सी मार्फतच करणे बंधनकारक असणार आदित्य बिरला पब्लिक स्कूल गडचांदूर तह. कोरपना हे गडचांदूर न.प. क्षेत्रापासून ६ .०० कि.मी. अंतरावर असल्यामुळे गडचांदूर न.पं. कार्यालयाचे अग्निशमन यंत्रणा अतिप्रसंगी अनुचित वेळेस सहजरीत्या घटनास्थळी पोहचेल असे सुखकर मार्ग आहेत. सहकार्य करण्यास तयार आहे.

करिता आदित्य बिरला पब्लिक स्कूल आवारपूर ता. कोरपना, जिल्हा चंद्रपूर यांना सन इंडस्ट्रीयल सर्व्हीसेस, मुबई यांनी फायर सेफ्टी निरीक्षण करून जुलै २०२५ ते रोजीच्या फायर सेफ्टी ऑडीट रिपोर्ट नुसार खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अग्निशमन विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र करून देण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

**अटी व शर्ती :-**

१. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवन संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ व महाराष्ट्र प्रतिबंधक जीवन सौरक्षण उपाययोजना नियम २००९ चे तरतुदीचे अनुपालन करावे. त्या दृष्टीने व्यवस्था तत्पर ठेवावी.

२. उच्च तापमानाचे ठिकाणी स्प्रिंकलर्स पंपिंग, हायड्रन्ट, डिटेक्षण व फायर प्रेशर, यंत्रणा तत्पर ठेवावी.

३. आपत्ती व्यवस्थापन करण्याबाबत प्रशिक्षित कर्मचारी अग्निशमन साहित्य व यंत्रणा तत्पर ठेवावी.

४. विद्युत पुरवठा स्थळावर अपघात व जीवित हानी होणार नाही याची काळजी घ्यावी.

५. महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय किंवा वरिष्ठ प्राधिकरणाकडून कोणताही आक्षेप आल्यास सदर नाहरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल.

६. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे तरतुदीचे अनुपालन करणे बंधनकारक राहील.

७. घटना स्थळावर कोणतीही अनुचित घटना घडल्यास मो.क्र. 9325107783 वर संपर्क साधावा.

**टिप:-** कोणतीही कायदेशीर अडचन / हरकत उपस्थित झाल्यास हे नाहरकत प्रमाणपत्र रद्द निलंबित करण्याचे अधिकार मु. अ. यांनी म.न.पा. अधिनियम १९६५ चे कलम ३३६ (३) अन्वये राखून ठेवले आहेत.

(आशिष चौहान)
मुख्याधिकारी
नगर परिषद गडचांदूर

Scanned with OKEN Scanner